## महाराष्ट्र शासन

### सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.१

| दूरध्वनी क्र. (वै)<br>(०२०)२६०५९२२५<br><br>आरोग्य सेवा | टेलिफॅक्स<br>(०२०)२६०५८३७३<br>(०२०)२६०५८३७८ | सेवा व्यवस्थापक विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), ८ केनडी रोड, नायडू हॉस्पीटल कंपाऊंड, पुणे - ४११ ००१ यांचे कार्यालय.<br>ई-मेल आयडी :smdwt.pune@ gmail.com |
|---|---|---|
| | जा.क्र.सेव्यविका/पुणे/तांत्रिक कक्ष/बॅटरी दरपत्रक / ee /२०२१,<br>दि. 0/2 फेब्रुवारी २०२६ | |


प्रति,

-------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------

**विषय :-** सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे अंतर्गत रुग्णवाहिका वाहनांकरीता आवश्यक विविध साईजच्या बॅटरीज करीता दरपत्रक सादर करणेबाबत...

**संदर्भ:-** मा. उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन) पुणे कार्यालयाचे व्हीसी द्वारे झालेली मिटींग, दिनांक-०१/०१/२०२६.

सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे **अंतर्गत रुग्णवाहिका वाहनांकरीता आवश्यक विविध साईजच्या बॅटरीज** सर्व करांसह **दरपत्रक** या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहेत. सदर सर्वकर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटरहेडवर **दिनांक ११/०२/२०२६ रोजी दुपारी ३.००** पर्यंत सिलबंद लिफाफयामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफयावर "**आवश्यक विविध साईजच्या बॅटरीज करीता दरपत्रक**" असा स्पष्ट उल्लेख करावा.

**- प्रपत्र -**

| Sr. No. | Batteries Sizes | Unit rate<br>(Including All Taxes) In Rupees |
|---|---|---|
| 1 | 12 V 100 AH | |
| 2 | 12 V 80 AH | |

दरपत्रके सादर करणेविषयीचा तपशिल व कालावधीः

| अ. क्र. | तपशिल | कालावधी |
|---|---|---|
| १ | या कार्यालयाचे सूचना फलकावर दरपत्रके सादर करणेसाठीचा नमुना प्रपत्र उपलब्ध असणे. | दिनांक ०२/०२/२०२६ ते ११/०२/२०२६ . |
| २ | दरपत्रके सादर करण्यासाठीची मुदत | दिनांक ११/०२/२०२६ वेळ - दु.३.०० पर्यंत |
| ३ | दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ | दिनांक ११/०२/२०२६, वेळ - दु.४.०० किंवा कामाजाचा लगतचा दिवस. |
| ४ | दरपत्रके उघडण्याचे ठिकाण | सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परीवहन), पुणे.१ |

प्राप्त संस्थांची दरपत्रके उघडण्याची वेळ ही **शक्यतो** दिनांक ११/०२/२०२६, वेळ - दु.४.०० **वाजता** किंवा कामकाजाचा लगतचा दिवस. असेल व सदर दरपत्रके उपस्थित असलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींचे समक्ष उघडण्यात येतील.

**दरपत्रके सादर करण्याबाबतच्या सूचना :**

१) पुरवठादार संस्थेकडून प्रस्तावीत साहित्य हे चांगल्या प्रतीचे असावे.
२) दरपत्रकासोबत एकल निविदा असणेबाबत तसेच खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचा हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत "निविदाकारांची हमी" चे विहीत प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे.
३) पुरवठादार संस्था प्रस्तावीत साहित्याबाबतचे उत्पादक/उत्पादक कंपनीचा अधिकृत विक्रेता/वितरक असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
४) दरपत्रक संस्थेच्या लेटरहेडवर सादर करावे तसेच त्यावर GST क्रमांक नमूद करण्यात यावा. तसेच सोबत GST प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.
५) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकाचा विचार करण्यात येणार नाही.
६) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.
७) विहीत नमुन्यात सादर न केलेले दरपत्रक स्विकारण्यात येणार नाही.
८) विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.
९) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रक तात्काळ रद्द करण्यात येईल.
१०) दरपत्रकातील दर हे सद्यस्थितीत लागू असलेल्या करांसहित असावेत.
११) दरपत्रकासोबत शॉप ॲक्ट परवान्याची छायांकितप्रत, जोडणे अनिवार्य आहे.
१२) दरपत्रकासोबत पॅन कार्डची छायांकितप्रत, जोडणे अनिवार्य आहे
१३) अनुदानाच्या उपलब्धतेनुसार आवश्यक संख्येत बदल होतील.
१४) कोणतेही लेखी कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन) पुणे यांना राहील.

सेवा व्यवस्थापक,
विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा
(परिवहन), पुणे.

प्रत /- नोटीस बोर्ड

## दरपत्रकारांनी द्यावयाच्या हमीपत्राचा नमूना

## प्रपत्र - अ

मी/आम्ही/आमची संस्था या पत्रान्वये हमी देतो की, आमचा खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर कोणत्याही प्रकारे हितसंबंधाचा संघर्ष नाही तसेच मी/आम्ही/आमची संस्था सदर प्रस्तावित साहित्यासाठी फक्त एकच दरपत्रक सादर केलेले आहे. तसेच दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थांमध्ये आम्हाला कोणत्याही प्रकारचे थेट स्वारस्य नाही.

दिनांक :-

दरपत्रकाराची सही व संस्थेचा शिक्का